श्री साईनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ] श्रावण शके १८४५ [ अंक ६ वा.

मलिनीकृतगात्र अल्पमतिमत्वम् । [illegible]



क्षणमपि सज्जन संगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥
श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.
प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.
श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रा बी. बी. रेल्वे.

## अनुक्रमणिका.

| | |
|---|---|
| महाराजांचे अनुभव... ... ... ... | ...५२-५९ |
| स्फुट विषय ... ... ... ... ... | ...२३-४० |
| श्री साईसच्चरित ... ... ... ... | १०९-१२४ |

या अंकात दोन पृष्ठें जास्त दिलीं आहेत तीं पुढें कमी करण्यांत येतील.

---

### सालमजकुरीं गोकुळ अष्टमी निमित्तें शिर्डी येथील कार्यक्रम खालील प्रमाणें ठरला आहे:—

श्रावण कृ० प्रतिपदा सोमवार तारीख २७ आगष्ट रोजीं नाम सप्ताह सुरू होईल व श्रावण कृष्ण ९ मंगळवारीं सकाळीं नित्याप्रमाणें काकड आरती होऊन समाप्त होईल. प्रतिपदेपासून अष्टमी पर्यंत रोज हरिभक्तिपरायण बाबुराव बुवा औरंगाबादकर यांचे कीर्तन होईल.

श्रावण कृष्ण ८ सोमवारीं मध्यरात्रीं श्रीकृष्ण जन्मोत्सव होईल.

श्रावण कृ. ९ मंगळवारीं दिवसा भंडारा होऊन रात्रीं दिंड्या वगैरे समारंभाची मिरवणूक निघेल.

श्रावण १० बुधवारीं काला होईल.

या उत्सवाप्रीत्यर्थ कोणाला कांहीं पाठविणें असल्यास तें रा. रा. तात्या गणपत पाटील कोते यांचे नावें मु॥ शिरडी, पोस्ट राहतें जि० अहमदनगर येथें पाठविलें जावें.

( १४ )

एकदां माझे एक स्नेही महाराजांचे दर्शनास आले व तेथें बसल्यावर महाराजांचे पाय दाबूं लागले. पाय दाबतां दाबतां महाराज एकदम त्यांना म्हणाले " पाय दाबूं नकोस सरकून बैस " त्याप्रमाणें ते गृहस्थ मागें सरकले. थोडया वेळानें त्यांचे डोळे भरून आलेले दिसले. त्यावर थोडा वेळ गेला व मग ते पुन: पाय दाबूं लागले. त्या वेळीं महाराज कांहीं बोलले नाहींत. नंतर ते स्नेही वाडयांत आले तेव्हां सांगूं लागले कीं, पहिल्यांदा पाय दाबीत असतां एक अमंगळ विचार माझे मनांत आला व तत्क्षणींच महाराजांनीं मला सरकून बसायाला सांगितलें. मग मला त्याबद्दल पश्चाताप झाला व मनांतल्या मनांत महाराजांची क्षमा मागितली.व त्यानंतर पुन्हां पाय दाबूं लागलों तों महाराजांनी कांहीं मनाई केली नाही.अशाच तऱ्हेचे अनुभव महाराजांचे भक्तांना नित्य येत. अर्थात् महाराजांची शिक्षण पद्धति अवर्णनीय होती.

(१५)

## ॥ श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न ॥

एकदां मी सकाळीं नित्याप्रमाणें महाराजांचे दर्शनास गेलों तेव्हां महाराज धुनीपाशीं उभे होते. मी जाऊन पायां पडतांक्षणींच महाराज म्हणाले "अरे काळजी तुला कसली. सगळी काळजी मला आहे" मी पुन्हां नमस्कार करून म्हटलें "खरेंच सगळी काळजी आपल्यालाच आहे." महाराजांना आमच्याबद्दल आमच्यापेक्षां कितीतरी पटीनें जास्त काळजी आहे याचे नित्य अनुभव येत असल्यामुळें महाराजांचें बोलणें अक्षरश: पटलें. तरीपण हे शब्द आज महाराजांनी कां उच्चारिले या बद्दल खुलासा होईना. तो खुलासा मी मुंबईस गेल्यावर झाला. ज्या दिवशीं महाराजांनीं हे शब्द उच्चारिले त्याच दिवशी माझी मुलगी पार्ल्यास माझ्या घरीं दिवाणखान्यांत खेळत असतां कोपऱ्यांत असलेल्या कपाटावर चढूं लागली तोंच तें कपाट तिच्या अंगावर आलें. ती खालीं पडली व कपाट तिच्यावर पडलें. कपाटावर कांचेचीं व धातूचीं खेळणीं होतीं पण

सर्वस्वी काळजी वाहणाऱ्या मालकाची अशी कांहीं कृपा कीं,तीं सर्व खेळणीं जणूंकाय उचलून बाजूला ठेविल्यासारखीं आणि मुलीला यत्किंचितही इजा झाली नाहीं. नाहीं म्हणावयाला तिची एक बांगडी पिचली व तिचा हात त्यामुळें थोडासा खरचटला.

असेंच एकदां तीच मुलगी रात्रीं शौचकूपांत गेली तों तेथें एक मोठा साप होता, मुलीचें वय तेव्हां पांच वर्षांचें होतें. साप तिनें पहाण्याचे पूर्वी तिच्या बरोबरच्या गड्यानें पाहिला व त्यानें तिला तावडतोब उचलून बाहेर नेली.

( १६ )

डहाणूचे उद्धवेशबुवा कांहीं मंडळी घेऊन एकदां द्वारकेस यात्रेला गेले होते. मुंबईहूनच आगबोटीनें गेले. सर्व मंडळीची टिकिटें बुवांचे जवळ होतीं. टिकिटांचें दोन भाग असतात, एक बोटीच्या टिकिटाचा व दुसरा मचव्याचे टिकिटाचा.बुवांनीं मचव्याचीं टिकिटें वेगळीं फाडून एका खिशांत ठेविलीं व बोटीचीं टिकिटें आपल्या पैशांच्या पाकिटांत ठेविलीं. आगबोटीवर असतांना तें पैशांचे पाकिट त्यांना कांहीं कारणास्तव बाहेर काढावें लागलें.त्यावेळीं ते कठड्यापाशीं उभे होते.पाकीट काढतां काढतां तें समुद्रांत जाऊन पडलें अर्थात बोटीचीं सर्व टिकिटें व बुवांचे पैसे, सर्व समुद्रांस्तृप्यंतु झाले. बोटींतून उतरतांना टिकिटें द्यावीं लागतात बुवांनीं टिकिट कलेक्टरांस वरील मजकूर सांगितला व टिकिटें घेतली होती या गोष्टीचे प्रत्ययासाठी मचव्याचीं टिकिटें दाखविलीं; तितक्याने टिकिट कलेक्टराची समजूत झाली व त्यानें कोणत्याहीं तऱ्हेनें अडविलें नाहीं. द्वारकेस उतरल्यावर गोमती स्नानाला, देवाच्या चरण स्पर्शाला, पूजेला कर द्यावा लागतो. बुवांजवळ अर्थात पैसे उरले नव्हते व महाराजावर अढळ श्रद्धा असल्यामुळें " तुजवांचुनि इतरांते दिन मुख पसरोनि काय मागावें" या पंतोक्तिप्रमाणें कोणाजवळ न मागतां शिर्डीस महाराजांस पत्र लिहिलें ज्या दिवशीं द्वारकेस बुवांनी पत्र लिहून टाकिलें त्याच रात्रीं महाराज डहाणूच्या एका धनिक भक्ताच्या स्वप्नांत गेले व त्याला पाकीट समुद्रांत पडल्याची हकीगत सांगून बुवांस तावडतोब पैसे पाठविण्याची

आंज्ञा केली. त्या भक्तानें दुसरेच दिवशी इन्सुअर करून पन्नास रुपये बुवांस पाठविले व स्वप्नाचा मजकूर लिहिला.

( १७ )

शंकरराव क्षीरसागर मामलतदार हे एकदां महाराजांचे दर्शनास आले असतां महाराजांनी दक्षिणा मागितली. त्यांनी खिशांत असलेले सर्व पैसे महाराजांचे हातांत दिले. वाडयांत आल्यावर त्यांना कोणी विचारिलें कीं 'तुम्हांला परत जाण्यास पैसे कोठें आहेत, शंकरराव म्हणाले बाबा देतील. त्याच दिवशीं संध्याकाळीं राहत्याचे पोष्टमास्तर आपल्या एका पाहुण्याला घेऊन तेथें आले. त्या पाहुण्याला शंकररावांनी वीस रुपये कांहीं वर्षांपूर्वी उसनें दिले होते. तें त्यानें त्या दिवशीं न मागतां शंकररावांना परत दिले.अर्थात शंकररावांची सर्व वेगमी तेवढयानें झाली.

( १८ )

महाराजांनी देह मंगळवार ता. १५ अक्टोबर १९१८ रोजीं तिसरे प्रहरीं ठेविला. त्याच दिवशीं रात्रीं ते येथील लक्ष्मण भटाच्या स्वप्नांत गेले आणि म्हणाले बापुसाहेब जोग माझी काकडआरती करावयाला येणार नाहीं, कारण त्याला वाटतें कीं मी मेलों. मी जिवंतच आहें. तूं येऊन माझी काकडआरती कर. स्वप्नांत आज्ञा झाल्याप्रमाणें पहाटेस लक्ष्मणभट मशिदींत गेले कारण बाबांचा देह ते दिवशीं मशिदीतच ठेविलेला होता. व त्यानें जाऊन तेथें आरती केली. त्यावेळीं बाबांचा हात हालत होता असा कित्येकांना भास झाला. दोनप्रहरीं आरती नित्याप्रमाणें मशिदींत झाली व संध्याकाळीं म्हणजे ता. १६ रोजीं बाबांचा देह बापूसाहेब बुट्टींचे वाडयांत आणून ठेविला आणि तेथें त्या रात्रीं शेजारती झाली आणि तेथें नित्याप्रमाणें काकडआरती, दोन प्रहरची आरती, संध्याकाळची आरती व शेजारती हा क्रम सुरु झाला तो अद्याप चालला आहे.

( १९ )

महाराज समाधिस्त झाल्यावर दोन तीन दिवसांनी सांटाक्रूझच्या मोरेश्वर-राव प्रधानांच्या मेहूणीचे स्वप्नांत गेले व म्हणाले, तुझ्या ट्रंकांमध्ये पिवळा

पितांबर आहे तो माझ्या समाधीवर घालण्यासाठीं पाठवून दे. त्या बाईनें तो पितांबर पुष्कळ वर्षांपूर्वी बाजूस ठेवून दिला होता व तिला त्याचें स्मरणही नव्हतें. सकाळीं उठल्यावर बाईनें आपलें स्वप्न मोरेश्वररावास सांगितलें व ताबडतोब ट्रंकामधून पितांबर काढून शिर्डीस पाठविण्यासाठीं त्यांचें स्वाधीन केला. तो हल्ली येथें आहे व मधून मधून महाराजांचे समाधीवर घातला जातो.

( २० )

एके दिवशीं पहाटेस लक्ष्मणराव उर्फ काका महाजनी यांचे स्वप्नांत महाराज गेले व म्हणाले " निजलास काय. उठ माझा आज तिसावा दिवस आहे तो कर " महाजनी जागे झाले व त्यांना वाटलें कीं, तिसावा दिवस तर केव्हांच होऊन गेला असेल, तरी पण त्यांनी दिवस मोजले व त्यांना असें आढळून आलें कीं तोच तिसावा दिवस आहे. त्यांनीं ब्राह्मणाला बोलावून महाराजांच्या पादुकांना अभिषेक करविला आणि कांहीं भक्तमंडळीस जेवावयास बोलावून महाराजांची प्रथम मासिक पुण्यतिथि साजरी केली. त्यानंतर प्रत्येक मासिक पुण्यतिथि मुंबईस साजरी करण्यांत आली.

( २१ )

## श्रीसाईबाबांच्या कांहीं लीलाबद्दल

**रा. रा. गणेश गोविंद नरके यांचे रा. रा. हरी सीताराम दिक्षित यांस आलेल्या ता० ४।३।१९१८ चे पत्रांतील उतारा:—**

परवाचे दिवशीं ( ता. २ मार्च १९१८ ) नाथषष्ठी ( श्री एकनाथ महाराजांची पुण्यतिथी ) झाली. दुपारीं बहुतेक मंडळीना बाबांनीं आजीबाईच्या पुराणास पाठविलें, तेथें बाईनीं रसाळ वाणीनें नाथांचे चरित्र सांगितलें तिकडे न्याहारीनंतर बाबांनीं कांहीं गोष्टी सांगितल्या त्यांत नामदेव व कबीर ह्यांचा उल्लेख होता सायंकाळीं भाकरीचे वेळीं बाबा तात्याशीं भांडले; भाकरीचें ताट फेंकून दिलें व सावण्या भरविणें, फळें खाणें वगैरे होण्यापूर्वींच समर्थांनीं नारसिंव्हाचा अवतार घेतला. वाड्यां-

तून फकीरबाबा, डॅाक्टर वगैरे मंडळी स्वरूप पहावयास देवळांत गेली होती; दादांला-म्हणाले " ह्याला ( तात्याला ) हाकून दे नाहीतर मीच खालीं जातों " आवेशांतच चौरंगाजवळ जाऊन तात्याला मारावयाला दोन धोंडे घेतले व बरेच संतापले तात्या खालीं आला; परंतु त्यानें " फळें खाऊं घातल्याशिवाय चावडींत जाऊं देणार नाहीं. " असा हट्ट घेतला. संध्याकाळीं ८-४५ चा घंटा झाली व सर्व मंडळी जमली, भजन सुरू झालें पण तात्या रुसला. बाबांनीं दादाकडून तात्याला बोलावू पाठविलें. पण तात्या हट्ट सोडीना व बाबा फळें खाण्याचें कबूल करीनात. ९-३० झाले, १०-३० झाले, मंडप स्त्री पुरुषांनीं गच्च भरला, पालखी तयार करून ठेवली. घोडा फाटकाजवळ उभा राहिला व भजनाचा कडाका उडून राहिला. बाबा गादीजवळून उठून चौरंगाजवळ आले व नंतर खांबाजवळ जाऊन बसले. बाबा शांत होते व कांहींच बोलत नव्हते. जिल्हे पैठणांत पालखी निघेपर्यंत बाबा उशीर करणार असें जो तो बोलूं लागला व जणूं काय पैठणांतच आहोंत असें समजून मंडळी कडाक्यानेंच नाचून भजन करूं लागली. ११ वाजले व दादांनीं घरीं जाण्याची परवानगी मागितली, बाबा म्हणाले "कुठे जातोस बैस" ह्यानंतर बाबा, विमारींत एकदा दरबार केला होता तसाच करितात कीं, काय असें वाटूं लागलें. फरक हा कीं, त्या दिवशीं अतिशय शांतता होती व ह्या दिवशीं मंडपांत भजनाचा कडाका उडून जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन राहिला होता. दोन्हीही चावडीचे दिवस होते. शेवटीं तात्यानीं आपला हट्ट सोडला. तात्यांनीं हट्ट सोडल्यावर बाबा हट्ट धरून बसले " नाहीं जायचं " असें म्हणत, दादाला म्हणाले " बरं बा फार रात्र झाली जा आतां" भजनाला व भटे लोकांना शिव्या देऊन भजन बंद करविलें. म्हाळसापतीला म्हणाले "चल आपण तक्यांत जाऊं " तात्या वर गेला त्याला सर्व मंडळीस हांकून देण्यास सांगितलें. कांहीं वेळानें तात्यालाही जावयास सांगितलें; सर्व मंडळी घरोघर गेली. बापूसाहेबही गेले, समर्थ ( आम्ही मी, खडके वगैरे मशीदींतच होतों ) गादीवर बसून पुन्हां संतापले, व शिव्या देऊं लागले बहुतेकांचा उच्चार झाला त्यांत आपलेंही नांव होतें. शेवटीं दोन प्रहर रात्रीस ( बाराचे सुमारास ) " चला " असें म्हणाले घाईघाईनें घंटा पुन्हां

वाजविली. तात्या व बापूसाहेब आले व वहिवाटीप्रमाणें चावडी फार आनंदानें झाली. नाथ षष्टीचीच हो लीला होय, असें सर्वांना वाटत होतें. दुसरे दिवशीं सकाळीं बैठकीचे वेळी ह्याच्याच गोष्टी होत्या. त्या वेळी गोष्टी बऱ्याच लांबल्या. उठावयास १०-३० वाजले. भिंतीजवळ तात्या आला; तात्या म्हणाला " काय बाबा आम्हाला नीट सांगितलं असतं कीं, दोन प्रहर रात्रींपर्यंत भजन करा म्हणजे जाऊं, तर कां आम्ही ऐकलं नसतं. " " लई खेलाडू. " बाबा म्हणाले " तुम्हीच. तुम्ही अन् बापुसाहेब हरदम खेले आहांत " लेंडीवरून परत जातांना लोकांना बाबा विचारीत होते " काल कां उशीर झाला होता ! " असो इथें फार आनंद आहे.

( २२ )

रा. रा. मोरेश्वरराव प्रधानांचा मोठा मुलगा एकदां बराच आजारी होता. त्या वेळीं त्यांच्या एथें एक तेलंगी शास्त्रीबुवा राहत असत. ते शास्त्रीबुवा श्री दत्तउपासक होते. त्यांना मोरेश्वरराव श्री सांई महाराजांचे भजनीं लागले हें पसंत नव्हतें. ते म्हणाले तुम्ही बाबांना सोडा व श्री दत्ताला शरण जा म्हणजे तुमचा मुलगा बरा होईल. प्रधान म्हणाले बाबा हे दत्तच आहेत. शास्त्रीबुवा म्हणाले जर हा मुलगा पांच मिनिटांत दूध पिऊं लागेल तर बाबा दत्त आहेत असें मी मानीन. व उद्यां पासून मुलाला आराम वाटू लागून लौकरच बरा होईल तर मी बाबांचे दर्शनास जाईन व सवाशें रुपये दक्षिणा देईन त्या मप्राणें पांच मिनिटांतच मुलगा दूध पिऊं लागला व दुसरे दिवसापासून त्याला आराम पडूं लागला. मुलगा साफ बरा झाल्यावर शास्त्रीबुवा शिर्डीस महाराजांचे दर्शनास गेले सवाशें रुपये दक्षिणा दिली. नंतर तिसरे प्रहरीं महाराजांनी पांच रुपये दक्षिणा मागितली. तेव्हां माधवराव देशपांडे महाराजांस म्हणालें "सकाळीं यांनीं सवाशें रुपये दिले आतां आणखी पांच रुपये कशाला !" महाराज म्हणाले "सवाशें रुपये दिले ते त्यानें आपल्या दत्ताला दिले. ते मला कोठें दिले!" शास्त्रीबुवांनीं मागितल्याप्रमाणें पांच रुपये दिले.

मनास आल्यास श्रीसाईबाबा आपल्या सभोंवार बसलेल्या भक्त-वृन्दास मोठ्या आनंदानें अनेक गोष्टी सांगत त्यांतील कांहीं खालीं दिल्या आहेत.

त्या एर्णेप्रमाणें.

(२३)

एका माळ्याकुणब्याचा मुलगा होता. तो वाड्यांत आला. तेथेंच तो वाढला. बारा वर्षें राहिल्यानंतर रडूं लागला. घरीं आईबापाकडे जाण्यासाठी रडूं लागला. त्याला बादशहानें सांगितलें, आपल्या आवारांत पुष्कळ वाडे आहेत. त्यांतल्याच एखाद्या वाड्यांत रहा असें त्याला सांगितलें. वाडा त्याला दिला. तो पुनः रडूं लागला. मग बादशहानें आपल्या मुलीशीं त्याचें लग्न लावून दिलें या मुलीला पोर झालें नाहीं, म्हणून त्यानें माळ्याकुणब्याची मुलगी तिच्याशींही लग्न लावलें. तरी फिरून रडूं लागला. बादशहानें पुष्कळ समजाविलें तरी तो गेला. मग बादशहानें त्याला कांहीं द्रव्य दिलें कारण बादशाह मोठाच माणूस होता. त्याचें नांव राहिलें आहे.

तात्पर्य-बादशहा इतका जीव देत होता.वाडा दिला. आपली मुलगी दिली तरी आईबापाकडे जाण्याची म्हणजे संसारांत पडण्याची ओढ गेली नाही.बादशाहा मोठा माणूस होता म्हणून त्याला कांहीं द्रव्य दिलें.पण जर बादशहाचे ऐकलें असतें आणि राहिला असता तर राज्यमिळालें असतें.

(२४)

चार भाऊ होते. त्यापैकीं दोघे एका गांवाला गेले. ते माळी कुणबी होते तेथें एक जाणती मुलगी होती. ती कबिराची होती. तेथें त्यांनीं कांहीं सणगें घेतलीं. नंतर त्या मुलीला खुणावलें. ती गेली. तिला घेऊन ते आपल्या गांवी गेले. मी लहान होतो. मीही संगें गेलों. गांवीं गेल्यावर लोकांनी चौकशी केली व भय घातलें. मग ते दोघे त्या मुलीला घेऊन एका डोंगरांत गेले. मीही मागोमाग गेलों. त्या मुलीला दोन बच्चे झाले पुढें तिच्या आईबापाला शोध लागला. कांहीं मंडळी म्हणाली पोरीला

घेऊन चला व या लोकांना मारून टाका. आईबाप म्हणाले पोरीला बच्चे झालें आहेत. आतां राहूं द्या.

## ( २५ )

एक वाणी होता. त्यानें तुपाचीं तीन भांडीं भरलीं. माझा म्हातारा जवळ होता तो म्हणाला माझ्यापुढें भांडी ठेवशील तर मी सगळें तूप एकटा खाईन. तितक्यांत वाण्याचा भाऊ त्याला जेवावयास बोलावयाला आला वाण्यानें तुपाची भांडी आंत दुकानांत ठेऊन कुलुप लावलें. माझ्या म्हाताऱ्याला वाणी म्हणाला मी जेऊन आलों म्हणजे तुम्हाला फुटाणे देईन. मी म्हाताऱ्याजवळच होतों. दुसरी दोन पोरें होती त्यांनी मागची भिंत पडकी होती. तिला एक लाथ मारली तों भिंत पडली व सगळें मोकाट झालें. मग त्या दोन पोरांनी दोन भांड्यांतलें तूप पार केलें. म्हाताऱ्यानें मला इशारा केला मग मी तिसऱ्या भांड्यांतलें तूप पार केलें. दुकानदार परत आला त्याला मी तुपाचें सांगितलें. दुकानदार पाहतो तों कांही सोनें वगैरेही नाहीसें झालें. मग आम्हाला सगळ्यांना चावडीवर नेलें. खरा चोर सांपडला आम्हाला सोडून दिलें: मग आम्हांला हगवण लागली तों सगळें तूपच हगूं लागलों मग माझ्या म्हाताऱ्यानें मला नीट केलें. त्या वाण्यानें पुढें मला दोन वर्षें जेऊं घातलें.

## श्रीसद्गुरु साईनाथ प्रसन्न.

शके १८४५ व इसवी सन १९२३ च्या रामनवमीच्या उत्सवा-बद्दल दास गणू महाराज यांनीं श्री चरणीं सादर केलेलें पत्रः—

श्री सच्चिदानंद सद्गुरु आधुनिक संतचुडामणी भक्तकाम कल्पद्रुम श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या पवित्र चरणारविंदी श्रीराम नव-मीच्या जमाखर्चाची व उत्सवाची हकीगत सादर करितों तीः—

(१) या उत्सवास अष्टमीपासून आरंभ होऊन द्वादशीस काला केला. उत्सवाची समाप्ती झाली. कांहीं पुर्तता होणें राहिली होती ती पोर्णिमेस केली. असा एकंदर ६ दिवस उत्सव झाला.

(२) या उत्सवास पाहुणे मंडळी आली तीः—

श्रीमंत आण्णासाहेब घोरपळकर, रावसाहेब माझोडकर, श्रीमंत आप्पासाहेब नार्नाळकर, जनार्दन अण्णा, गोविंद व्यंकटी महाजन, बाबा रामचंद्र पत्तेवार व त्यांचे गुमास्ते मंडळी, नागोबा, पापा लाला, नारायण, व्यंकोबा, बाबा श्रीमंत सरकार बुळे साहेब मंडळीसह व राणी साहेबांसह, नानासाहेब पाडळीकर, जिवन लाल गंगाराम शेटजी, भगवा-नराव मानरमकर, रामचंद्रराव वकील-वरुडकर, दादासाहेब वरुडकर, अशी मंडळी समक्ष हजर राहिली.

(३) अडचणीमुळें समक्ष न येतां आल्यामुळें ज्यांनीं उत्सवांत भाग घेतला ती मंडळी-धोंडोपंत वकील, बळवंतराव खेडकर, शंकरराव-मुळावेकर,

(४) आतां उत्सवास मुंबईकडील मंडळी आली तीः—

रावसाहेब दाभोळकर, काकासाहेब दीक्षित, रावसाहेब तर्खड, पुर्णचंद्रभय्या, वुटी, आपल्या मंडळीसह पुरंदरे, पुण्याचे दुकानदार रा. शिंदे, माळी, आंधेरीकर वेंडर, मास्तर, सुंदरराव नवलकर-

(५) आतां उत्सवास सहानुभूती दर्शविलेली मंडळी. बाळासाहेब रेगे, नारायण जनार्दन तेंडुलकर, काकासाहेब महाजनी, जनाबाई

कोठारे, मनमोहन रंगनाथ जयकर, वसंतराव, काका पाटील, श्रीकृष्ण पुरषोत्तम. भवानराव बनसोडे.

( ६ ) आतां ह्या उत्सवास खर्च झाला त्याचा तपशील:—

| जमा | | रु. | खर्च रु. |
|---|---|---|---|
| ७२-०-० | आपला चरणरज दासगण् ,२५ रु. रोख जरीचा हंमाल २७ रु. ४ उपरणीं २० रु. | २१० | रामचंद्र आनंदरुप मारवाडी साखर कणिक रवा तांदुळ डाळ वगैरे सामान पावती वरहु० |
| | | ४०-०-० | पंढरपुरकर आचारी |
| ७५-०-० | राजेसाहेब माझोडकर | ११५-०-० | दारुवाला शेखअहमद |
| ५०-०-० | गोविंद त्र्यंकटी महाजन. आकोळकर | | पावती वरहु० |
| ५०-०-० | बाझा रामचंद्र पत्तेवार | २२-०-० | कासम फकिर बाजेवाला |
| १५-०-० | धोंडोपंत वकील. | ११-०-० | विठोबा सुतार सर्पणा व० |
| १-०-० | शंकरराव मुळावेकर. | ५-४-६ | तेली तुकाराम |
| १-०-० | बळवंतराव खेडकर. | १०-०-० | यमाजी जगताप दुधाबद्दल |
| ५-०-० | आंधेरीकर वैद्य. | ६-०-० | भाजी |
| ५-०-० | आंधेरीकर मास्तर. | १०-०-० | रामनवमीच्या |
| १०-०-० | बापुभय्या कोठारी. | | अभिषेकाची दक्षिणा |
| ५१-०- | बुळेसाहेब | ५-०-० | आंधळे आणि पांगळें |
| ५-०-० | सुंदरराव नवलकर | | यांचीदक्षिणा. |
| ५-०-० | काकासाहेब दिक्षितांची बहीण | २७-१४-० | श्रीचा समाधी खर्च. पावती वरहु० |
| १५-०-० | चौंवळ | ५-०-० | भोजन दक्षिणा खर्च |
| ५-०-० | सीताबाई रामचंद्र सामंत. | १-८-० | म्हाळसाकांताचा फराळ |
| १-०-० | यशवंतराव अर्नाळेकर | ५-०-० | नाना चोपदार उपरणे पान |
| १०-०-० | बाबा सामंत. | ५-०-० | बाळा शिंपी ,, ,, [ १ रु.५ |
| ५-०-० | चितू शेट | ७-०-० | लक्ष्मण भट उपरणें पान १ रु. ७ |
| १००-०० | पापालाल. | २७-०-० | बाबा धर्माधिकारी रामा- |

१०-०-० नागोबा वंजारी यणाचे पारायणाची
१ तुपाचा डबा रु.३० पा.द.रु.१० जरीचा रुमाल रु. २७
३०-०-० त्र्यंकोबा वंजारी तुपाचा डबा.
४०-०-० लक्ष्मीबाई जोगळेकर २-०-० आप्यान्याला बैलगाडी भाड
तांदुळाचें पोतें २-०-० विडयांची पानें.
०-०-० दादा साहेब वरुडकर. ८-८-० घासलेट डबे २
उपरणे जोडी १ची किंमत. २-१२-० चिमण्या. ४
९-०-० रामराव वरूडकर ,, १-८-० घरे सारविण्यास
५-०-० गांधी १ गुळाची ढेप मोलकरीण व गडी यांची मजुरी.
८-०-० नारायण वंजारी उपरणे जोडी १
४-८-० वावारंगारी पत्रावळी
१॥ हजार द. ३ रु. प्रमाणें · १-०-० भांडी घासणारीण कोळीण
५-०-० पापालालची सासू. २-०-० कुंभार आनाजी वागरी
४-४-० दत्तोपंत इंगोलीकर. रांजण माखे परळ मिळून

५०-०-० हनुमंत जयंतीप्रीत्यर्थ.
उपरणे जोडया ५ एकंदर किं ५०

६७५-१२-० एकूण जमा.
९७-१०-० खूट आली ती
भरण्याकरितां

७७३-६-०

६-०-० नानु चहावाले संगमनेरकर उपरण्याचे पान १
६-०-० सुरुदिन घोडेवाला
उपरण्याचे पान १
६-०-० अबदुल उपरण्याचें
पान १
५-०-० मार्तंड भगत ,,
४-८-० रंग्यागुरव ,,
४-८-० मुरल्या ,,
६-०-० बाळा गुरव ,,
४-०-० महादु फसले ,,
४-८-० सुरदास ,,
४-८-० रंगतपीते २ " पाने २
१-८-० आनंदामास्तर " पान १
१०९-८-० वंदी प्रयोजन खर्च.

१-०-० हनुमंत जयंति प्रीत्यर्थ
अभिषेक खर्च.
१५-०-० आच्यान्याला जरीचा
रुमाल बांधला
१-०-० हरभरे वगैरे यांची डाळ
नारळ शेंदूर
५०-०-० महार मांग भिल्ल चांभार
यांना भोजन

७७३-६-० एकूण खर्च.

-¦-

एणेंप्रमाणें खर्च झाला आहे. यांत पेटीची जमा; हमान्याचा खर्च व तमाशाचा खर्च दाखविला नाहीं. तो तात्या पाटलास माहित आहे.

(७) आतां आपल्या या उत्सवांत ज्यांनीं यथाशक्ति मदत केली. त्यांना आपल्या कडोन इहपर लोकाचा उत्तम आशीर्वाद असावा व त्यांचे आपण रक्षण करावें. मोगलाईत नांदेड, मुखेड, उमरी, कुंटूर, फळ-वाजुरी, बोपाळे, रामेश्वर, सांगवी, सातेगांव, नायगांव, कोकलेगांव नार्नाळी, अशा गांवीं तुमची मंडळीं आहेत. त्यांचे आपण रक्षण करावें. आपलीं आम्ही पिलें आहोंत. आपल्या सुखदपंखांखालीं आमचें सर्वदा रक्षण व्हावें. झालेला खर्च चरणीं सादर केला आहे. कळावें सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना; न्यूनाधिकाची क्षमा करावी.

आपला चरणरज,

दासगण

## ह. भ. परायण दासगणूकृत श्रीसाईनाथ स्तवन मंजिरी

श्रीगणेशायनमः । हे सर्वाधारामयूरेश्वरा । सर्वसाक्षी गौरी कुमरा ॥
हे अचिंत्या लंबोदरा । पाहिमां श्री गणपते ॥ १ ॥
तूं सकल गणांचा आदि ईश । म्हणून म्हणती गणेश ॥
तूं संमत सर्व शास्त्रांस । मंगलरूपा भालचंद्रा ॥ २ ॥
हे शारदे वाग्विलासिनी । तूं शब्द सृष्टी स्वामिनी ॥
तुझें अस्तित्व म्हणूनी । व्यवहार चालती जगताचे ॥ ३ ॥
तूं ग्रंथकाराची देवता । तूं भूषण देशाचें सर्वथा ॥
तुझी अवघ्यांत अगाध सत्ता । नमो तुजसीं जगदंबे ॥ ४ ॥
हे पूर्णब्रह्मा संतप्रिया । हे सगुणरूपा पंढरीराया ॥
कृपार्णवा परम सदया । पांडुरंगा नरहरे ॥ ५ ॥
तूं अवघ्यांचा सूत्रधार । तुझी व्याप्ती जगभर ॥
अवघीं शास्त्रें विचार । करिती तुझ्या स्वरूपाचा ॥ ६ ॥
पुस्तकज्ञानी जे जे कोणी । त्यां तूं न गवससी चक्रपाणी ॥
त्या अवघ्या मूर्खांनीं । शब्दवाद करावा ॥ ७ ॥
तुला जाणती एक संत । बाकीचे होती कुंठित ॥
तुला माझा दंडवत । आदरें हा अष्टांगीं ॥ ८ ॥
हे पंचवक्त्रा शंकरा । हे नरुंड मालाधरा ॥
हे नीलकंठादिगंबरा । ॐमकाररूपा पशुपते ॥ ९ ॥
तुझें नाम ज्याचे ओठीं । त्याचें दैन्य जाय उठाउठी ॥
ऐसा आहे धूर्जटी । महिमा तुझ्या नांवाचा ॥ १० ॥
तुझ्या चरणा वंदून । मी हें स्तोत्र करितों लेखन ॥
यास करावें साह्य पूर्ण । तूं सर्वदा नीलकंठा ॥ ११ ॥

आतां वंदूं अत्रीसुता ॥ इंदिराकुलदैवता ॥
श्री तुकारामादि सकल संतां । तेवी अवघ्या भाविकांसीं ॥ १२ ॥
जयजयाजी साईनाथा । पतीत पावना कृपावंता ॥
तुझ्या पदीं ठेवितों माथा । आतां अभय असूं दे ॥ १३ ॥
तूं पूर्ण ब्रह्मा सौख्य धामा । तूंच विष्णू नरोत्तमा ॥
अर्धांगी सी ज्याची उमा । तो कामारी तूंच कीं ॥ १४ ॥
तूं नरदेह धारी परमेश्वर । तूं ज्ञान नभींचा दिनकर ॥
तूं दयेचा सागर । भवरोगां तूं औषधी ॥ १५ ॥
तूं हीनदीनां चिंतामणी । तूं तव भक्तां स्वर्धुनी ॥
तूं बुडतियांनां भव्य तरणी । तूं भीतासी आश्रय ॥ १६ ॥
जगाचें आद्य कारण । जें कां विमल चैतन्य ॥
ते तुम्हींच अहा दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥ १७ ॥
आपण जन्मरहीत । मृत्युही ना आपणाप्रत ॥
तेच अखेर कळून येत । पूर्ण विचारें शोधितां ॥ १८ ॥
जन्म आणि मरण । हीं दोन्हीही अज्ञानजन्य ॥
आपण दोहोंपासून । अलिप्त मुळींच महाराजा ॥ १९ ॥
पाणी झऱ्यांत प्रगटलें । म्हणून कां तेथ उपजलें ॥
तें पूर्वीच होतें पूर्ण भरलें । आलें मात्र आंतुनी ॥ २० ॥
त्याचेंत आलें जीवन । म्हणून लाधलें अभिधान ॥
झरा ऐसें तिज लागून । जलाभावीं त्याचची ॥ २१ ॥
लागला आणि आटला । हें मुळीं न ठावें जला ॥
कांकीं जल त्याचेला । देत नव्हतें महत्व मुळीं ॥ २२ ॥
त्यांचेसीं मात्र अभिमान । जीवनाचा परिपूर्ण ॥
म्हणून तें आटतां दारूण । दैन्यावस्था ये तिशीं ॥ २३ ॥

नरदेहही त्यांच खरी। शुद्ध चैतन्य विमलवारी ॥
त्यांचा अनंत होती जरी। परी न पालट तोयाचा ॥ २४ ॥
म्हणून अजन्मा आपणां। मी म्हणतसें दयाघना ॥
अज्ञान नगाच्या कंदना करण्या व्हावें वज्र तुम्ही ॥ २५ ॥
ऐशा त्यांचा आजवर बहुत झाल्या भूमीवर ॥
हल्लीं असून होणार। पुढेंही कालावस्थेनें ॥ २६ ॥
त्या प्रत्येक त्यांचेप्रत। निराळें नांवरूप मिळत ॥
जेणें करून जगतांत। ओळख त्यांची पटतसे ॥ २७ ॥
आतां चैतान्यप्रत। मी तूं म्हणणें हें ना उचित ॥
कांकीं न जेथें संभवे द्वैत। तेंच चैतन्य निश्चयें ॥ २८ ॥
आणि व्याप्ती चैतन्याची। अवघ्या जगाठाईं साची ॥
मग मी तूं या भावनेची। संगत कैशी लागते ॥ २९ ॥
जल मेघगर्भींचें। एकपणें एकसाचें ॥
अवतरणें भूवरी होतां त्याचें। भेद होती अनेक ॥ ३० ॥
जें गोदेच्या पात्रांत। तें गोदा म्हणून वाहिलें जात ॥
जें पडे कूपांत। तैसी न त्याची योग्यता ॥ ३१ ॥
संत रूप गोदावरी। तेथील तुम्हीं अहा वारी ॥
आम्हीं थिल्लर कूप सरोवरीं। म्हणून भेद तुम्हां आम्हां ॥ ३२ ॥
आम्हां न्हावया कृतार्थ। आलें पाहिजे तुम्हांप्रत ॥
शरण सर्वदा जोडून हात। कां कीं पवित्रता तुम्हां ठाई ॥ ३३ ॥
पात्रामुळें पवित्रता। आली गोदा जलासी सर्वथा ॥
नुसत्या जलांत पाहतां। तें एकपणें एकची ॥ ३४ ॥
पात्र गोदावरीचें। जे कां ठरलें पवित्र साचें ॥
तें ठरण्यातद भूमीचे। गुणदोष झाले साह्य पहा ॥ ३५ ॥

मेघगर्भांच्या उदकाला । जो भूमी भाग न बदलवी भला ॥
त्याच भूमीच्या भागाला । गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते ॥ ३६ ॥
इतरत्र जें जल पडलें । त्यानें पात्रगुणा स्वीकारलें ॥
रोगी कडूखारट झालें । मूळचें गोड असूनी ॥ ३७ ॥
तैसें गुरुवरा आहे येथ । षड्रिपूची न घाण जेंथ ॥
त्या पवित्र पिंडाप्रत । संत अभिधान शोभतसे ॥ ३८ ॥
म्हणून संत ती गोदावरी-। मी म्हणतों साजिरी ॥
अवघ्या जीवात आहे खरी । आपुली श्रेष्ठ योग्यता ॥ ३९ ॥
जगदारंभापासून । गोदा आहेच निर्माण ॥
तोयही भरलें परिपूर्ण । तुटी न झाली आजवरी ॥ ४० ॥
पहा जेव्हां रावणारी । येता झाला गोदातिरीं ॥
त्या वेळचें तेथील वारी । टिके कोठून आजवरी ॥ ४१ ॥
पात्रमात्र तेंच उरलें । जल सागर मिळाले ॥
पावित्र्य कायम राहिले । जल पात्राचें आजवरी ॥ ४२ ॥
प्रत्येक संवत्सरीं । जुनें जाऊनी नवें वारी ॥
येत पात्राभीतरी । तोच न्याय तुम्हां दाया ॥ ४३ ॥
शतक तेंच संवत्सर ॥ त्या शतकांतील साधूवर ॥
हेंच जल साचार ॥ नाना विभूती ह्या लाटा ॥ ४४ ॥
या संतरूप गोदेसीं । प्रथम संवत्सरासीं ॥
पूर आला निश्चयेसीं । सनत्सनक सनंदनाचा ॥ ४५ ॥
मागून नारद तुंबर । ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर ॥
शबरी अंगद वायूकुमर । विदूर गोपगोपिका ॥ ४६ ॥
ऐसें बहूत आजवरी । प्रत्येक शतकामाझारीं ॥
पूर आले वरच्यावरी । ते वर्णण्या अशक्यमी ॥ ४७ ॥

या सांप्रतच्या शतकांत । संतरूप गोदेप्रत
आपण पूर आळांत । साइनाथा निश्चयें ४८ ॥
म्हणून तुमच्या दिव्य चरणा । मी करितों वंदना ॥
महाराज माझ्या दुर्गुणा । पाहूं नका किमपीही ॥ ४९॥
मी हीन दीन अज्ञानो । पातक्यांचा शिखामणी ॥
युक्त अवघ्यां कुलक्षणांनीं । परि अव्हेर करूं नका ॥ ५० ॥
लोहा अंगींचे दोष । मना न आणी परीस॥
गांविच्या लेंडया ओहोळास । गोदा न लावी परतवूनि ॥ ५१ ॥
माझ्यामधील अवघी घाण । आपल्या कृपाकटाक्षें करून ॥
करा करा वेगें हरण । हीच विनंती दासाची ॥ ५२ ॥
परिसाचा संग होऊन । लोहाचें ते लोहपण ॥
जरी न होय गुरुवरा हरण । तरी हीनत्व परिसाशीं ॥ ५३ ॥
मला पापी ठेवूं नका । आपणा हीनत्व घेऊं नका ॥
आपण परीस मी लोह देखा । माझी चाड आपणांते ॥ ५४ ॥
बालक अपराध सदैव करितें । परी न माता रागावते॥
हें आणून ध्यानातें कृपा प्रसाद करावा ॥ ५२ ॥
हे साइनाथा सद्गुरु। तूंच माझा कल्पतरू ॥
भवाब्धीचे भव्य तारूं। तूंच अससी निश्चयें ॥ ५६ ॥
तूं कामधेनू चिंतामणी । तूं ज्ञान नभींचा वासरमणी ॥
तूं सद्गुणाची भव्य खाणी । अथवा सोपान स्वर्गांचा ॥ ५७ ॥
हे पुण्यवंता परम पावना । हे शांत मूर्ते आनंदघना ॥
हे चित्स्वरूपा परिपूर्णा । हे भेदरहित ज्ञान सिंधो ॥ ५८ ॥
हे विज्ञान मूर्ति नरोत्तमा। हे क्षमाशांतीच्या निवासधामा ॥
हे भक्त जनाच्या विश्रामा । मसीद मसीद मजप्रती ॥ ५९ ॥

तूंच सद्गुरू मछिंदर । तूंच महात्मा जालंदर ॥
तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर । कबीर शेखानाथ तूं ॥ ६० ॥
तूंच बोधला सांवता । तूं रामदास तत्वता ॥
तूंच तुकाराम साइनाथा । तूंच सखा माणिक प्रभू ॥ ६१ ॥
या अपुल्या अवताराची ॥ परी आहे अगम्य साची ॥
ओळख आपुल्या ज्ञातीची ॥ होऊं न देतां कवणातें ॥ ६२ ॥
कोणी आपणा म्हणती यवन । कोणी म्हणती ब्राह्मण ॥
ऐसी कृष्णासमान । लीला आपण मांडिली ॥ ६३ ॥
श्री कृष्णास पाहून । नाना प्रकारें वदले जन ॥
कोणी म्हणाले यदुभूषण । कोणी म्हणाले गुराखी ॥ ६४ ॥
यशोदा म्हणे सुकुमार बाळ । कंस म्हणे हा महाकाळ ॥
उद्धव म्हणे प्रेमळ । अर्जुन म्हणे ज्ञानजेठी ॥ ६५ ॥
तैसे गुरुवरा आपणासीं । जें ज्याच्या मानसीं ॥
योग्य वाटेल निश्चयेसीं । तें तें तुम्हां तो म्हणतसे ॥ ६६ ॥
मशीद आपुले वसतिस्थान । विंधावांचून आहेत कर्ण ॥
फात्याच्या तऱ्हा पाहून । यवन म्हणणें भाग तुम्हां ॥ ६७ ॥
तैसी अग्नीची उपासना । पाहूनि आपुली दयाघना ॥
निश्चय होत आमुच्या मना । कीं आपण हिंदू म्हणूनी ॥ ६८ ॥
परी हे भेद व्यवहारीक । यातें चाहतील तार्किक ॥
परी जिज्ञासू भाविक । त्यां न वाटे महत्व यांचें ॥ ६९ ॥
आपुली आहे ब्रह्मस्थिती । जात गोत ना आपणाप्रती ॥
आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती । अहां आद्यकारण ॥ ७० ॥
यवन हिंदूचे विपट आलें । म्हणून तद्द्वय करण्या भलें ॥
मशीदअग्नीला स्वीकारिलें । लीला भक्तांस दावावया ॥ ७१ ॥

आपण जातगोतातीत। सद्वस्तू जी का सत ॥
तीच तुम्ही साक्षात। तर्कातीत सांचकीं ॥ ७२ ॥
तर्क वितर्कांचें घोडें। चालेल किती आपणांपुढें ॥
तेथें माझें बापुडें। शब्द टिकतील कोठुनी ॥ ७३ ॥
परी पाहुनी तुम्हाला। मौन नये धरितां मला ॥
कां कीं शब्द हेंच स्तुतीला। साहित्य आहेत व्यवहारीं ॥ ७४
म्हणून शब्दें करून। जें जें होईल वर्णन ॥
तें तें सर्वदा करीन। आपुल्या कृपाप्रसादें ॥ ७५ ॥
संताची योग्यता भली ॥ देवाहून आगळी ॥
अजादुजास नाहीं मुळीं। स्थान जवळ साधुंच्या ॥ ७६ ॥
हिरण्यकश्यपू रावणाला। देवद्वेषें मृत्यु आला ॥
तैसा एकही नाहीं घडला। प्रकार संत हस्तानें ॥ ७७ ॥
गोपीचंदें उकीरड्यासी। गाढिलें जालंदरासी ॥
परी त्या महात्म्यासी। नाहीं वाटला विषाद ॥ ७८ ॥
उलट राजाचा उद्धार केला। चिरंजीव करूनी सोडिला ॥
ऐशा संताच्या योग्यतेला। वर्णन करावें कोठवरीं ॥ ७९ ॥
संत सूर्य नारायण। कृपा त्यांची प्रकाशपूर्ण
संत सुखद रोहिणी रमण। कौमुदी ती तत्कृपा ॥ ८० ॥
संत कस्तुरी सोज्वळ कृपा त्यांची परिमळ ॥
संत इक्षु रसाळ। रस नव्हाळी तत्कृपा ॥ ८१ ॥
संत सुष्टदुष्टांप्रती। समसमान निश्चिती ॥
उलट पाप्यावरी प्रीती। अलोट त्यांची वसतसे ॥ ८२ ॥
गोदावरी जलांत। मळकट तेंच धुवाया येत ॥
निर्मळ तें संदुकींत। राहे लांब गोटे पूनी ॥ ८३ ॥

जे संदुकीमध्ये बसलें। तेंही वस्त्र एकदां आलें॥
होते घ्यावयालागीं भलें। गोदावरीचें पात्रांत॥ ८४॥
येथें संदूक वैकूंठ। गोदा तुम्हीं निष्ठाघाट॥
जीवात्मे हेच पट। षड्विकार मळ त्यांचा॥ ८५॥
तुमच्या पदाचें दर्शन। हेंच आहे गोदा स्नान॥
अवघ्या मळातें घालवून। पावन करणें समर्था॥ ८६॥
आम्हीं जन हे संसारीं। मळत आहों वरच्यावरी॥
म्हणून आम्हींच अधिकारी। संतदर्शन घेण्यास्तव॥ ८७॥
गौतमी माजी विपूल नीर आणि धुणें मळकट घांटावर॥
तैसेंच पडल्या साचार। त्याचें हीनत्व गोदेसी॥ ८८॥
तुम्ही सघन शीततरूवर। आम्हीं पांथस्थ साचार॥
तापत्रयाचा हा मखर। तापलासे चंडांशु॥ ८९॥
त्याच्या तापापासून सदया। करा रक्षण गुरुराया॥
सत्कृपेची सीतळ छाया। आहे आपुली लोकोत्तर॥ ९०॥
वृक्षाखालीं बैसून। जरी लागतें वरून ऊन॥
तरी त्या तरूलागून। छाया तरू कोण म्हणे॥ ९१॥
तुमच्या कृपेवीण पाही। जगांत बरें होणें नाहीं
अर्जुनाला शेषशाई। सखा लाभला धर्मास्तव॥ ९२॥
सुग्रीव कृपेनें विभीषणा। लाधलासे रामराणा॥
संतामुळेंच मोठेपणा। लाधला श्रीहरीसी॥ ९३॥
ज्याचें वर्णन वेदासी। न होय ऐशा ब्रम्हासीं॥
सगूण करून भूमीसी। नाचविलें संतांनीच॥ ९४॥
दामाजीनें बनविला महार। वैकुंठपती रुक्मीणीवर॥
चोखोबानें उचलण्या ढोरें। राबविलें त्या जगदात्मया॥ ९५।

संतमहात्व जाणून । पाणी वाहीं जगज्जीवन ॥
संत खरेंच यजमान । सच्चिदानंद प्रभूचें ॥ ९६ ॥
फार बोलणें नलगे आतां । तूंच आम्हां माता पिता ॥
हे सद्गुरु साइनाथा । शिर्डि ग्रामनिवासिया ॥ ९७ ॥
बाबा तुमच्या लीलेचा । कोणा न लागे पाडसाचा ॥
तेथें माझी आर्षवाचा । टिकेल सांगा कोठून ॥ ९८ ॥
जड जीवांच्या उद्धारार्थ । आपण आलांत शिर्डींत ॥
पाणी ओतून पणत्यांत । दिवे तुम्हीं जाळिले ॥ ९९ ॥
सवाहात लाकडाची । फळी मंचक करून साची ॥
आपुल्या योगसामर्थ्याची । शक्ति दाविली भक्तजना ॥ १०० ॥
वांझपणा कैकांचा । तुम्ही केलांत हरण साचा ॥
कित्येकांच्या रोगांचा । वीं मोड केलांत उदीनें ॥ १०१ ॥
वारण्या ऐहिक संकटे । तुम्हां न कांही अशक्य वाटे ॥
पिपीलिकेचें कोठून मोठें । ओझें मानी जगपती ॥ १०२ ॥
असो आतां गुरुराया । दीनावरी करा दया ॥
मी तुमच्या लागलों पाया । मागें न लोटा मजलागी ॥ १०३ ॥
तुम्ही महाराज राजेश्वर । तुम्हीं कुबेराचे कुबेर ॥
तुम्ही वैद्यांचे वैद्य निर्धार । तुम्हांविण ना श्रेष्ठ कोणी ॥ १०४ ॥
अवांतराचे पूजेस । साहित्य आहे विशेष ॥
परी पूजाया तुम्हांस । जगीं न पदार्थ राहिला ॥ १०५ ॥
पहा सूर्याचिया घरीं । सण दिपवाळी आली खरी ॥
परि ती त्यानें साजिरी । करावी कोणत्या द्रव्यें ॥ १०६ ॥
सागराची शमवावया । तहान जल ना महीठाया ॥
वन्हीलागीं शेकावया । अग्नी कोठून ध्यावा तरी ॥ १०७ ॥

जे जे पदार्थ पूजेचे। ते ते तुमच्या आत्म्याचे ॥
अंश आधींच असती साचे। श्रीसमर्था गुरुराया ॥ १०८ ॥
हें तत्व दृष्टीचें बोलणें। परी न तैशी झालीं मनें ॥
बोललों अनुभवाविणें। शब्दजाल निरर्थक ॥ १०९ ॥
व्यवहारीक पूजन जरी। तुमचें करूं मी सांग तरी ॥
तें कराया नाहीं पदरीं। सामर्थ्य माझ्या गुरुराया ॥ ११० ॥
बहुतेक करून कल्पना। तुमच्या करतों पूजना ॥
तेंच पूजन दयाघना। मान्य करा या दासाचें ॥ १११ ॥
आतां प्रेमाश्रु करून। तुमचें प्रक्षालितों चरण।
सद्भक्तीचें चंदन। उगाळून लावितों ॥ ११२ ॥
कफनी शब्दालंकाराची। घालितों ही तुम्हां साची ॥
प्रेमभाव या सुमनांची। माळा गळ्यांत घालितों ॥ ११३ ॥
धूप कुत्सितपणाचा। तुम्हांपुढें जाळितों साचा।
जरी तो वाईट द्रव्याचा। परी ना सुटेल घाण त्याशीं ॥ ११४ ॥
सद्गुरुविण इतरत्र। जे जे धूप जाळितात ॥
त्या धूप द्रव्याचा तेथ। ऐसा प्रकार होतसे ॥ ११५ ॥
धूप द्रव्यास अग्नीचा। स्पर्श होताक्षणीं साचा ॥
सुवास सद्गुण तदंगीचा। जात त्याला सोडूनि ॥ ११६ ॥
तुमच्या पुढें उलटें होतें। घाण तेवढी अग्नींत जळतें ॥
सद्गुण उरती पाहण्यातें। अक्षयीचे जगास ॥ ११७ ॥
मनींचें जळाल्या कुत्सितपण। मलरहित होईल मन ॥
गंगेचें गेल्या गढूळपण। मग ती पवित्र सहजची ॥ ११८ ॥
दीप माया मोहाचा। पाजळितों मी हा साचा॥
तेणें वैराग्य प्रभेचा। होवो गुरुवरा लाभ मशीं ॥ ११९ ॥

शुद्ध निष्ठेचें सिंहासन । देतों बसाया कारण ॥
त्याचें करूनियां ग्रहण । भक्तिनैवेद्य स्वीकारा ॥ १२० ॥
भक्तीनैंवेद्य तुम्हीं खाणें । तद्रस मला पाजणें ॥
कांकीं मी तुमचें तान्हें । पयावरी हक्क माझा ॥ १२१ ॥
मन माझें दक्षणा । ती मी अर्पितों आपणां ॥
जेणें नुरेल कर्तेपणा । कशाचाही मजकडे ॥ १२२ ॥
आतां प्रार्थना पूर्वक मात्र । घालितों मी दंडवत ॥
तें मान्य होवो आपणांप्रत । पुण्य श्लोका साईनाथा ॥ १२३ ॥

॥ प्रार्थनाष्टक ॥

॥ श्लोक ॥

शांत चित्ता महाप्रज्ञा साइनाथा दयाघना ॥
दया सिंधो सत्स्वरूपा । माया तम विनाशना ॥ १ ॥ १२४ ॥
जात गोतातिता सिद्धा । अचिंत्या करुणालया ॥
पाहि मां पाहि मां नाथा । शिर्डीग्राम निवासिया ॥ २॥ १२५ ॥
श्री ज्ञानार्का ज्ञान दात्या । सर्व मंगलकारका ॥
भक्त चित्त मराळा हे । शरणागत रक्षका ॥ ३ ॥ १२६ ॥
सृष्टिकर्ता विरिंची तूं । पाता तूं इंदिरापती ॥
जगत्रया लया नेता । रूद्र तो तूंच निश्चिती ॥ ४ ॥ १२७ ॥
तुजवीणें रिता कोठें । ठाव नाया महीवरी ॥
सर्वज्ञ तूं साईनाथा । सर्वांच्या हृदयांतरीं ॥ ५ ॥ १२८ ॥
क्षमा सर्वापराधाची । करावी हेंच मागणें ॥
अभक्ती संशयाच्या त्या । लाटा शीघ्र निवारणें ॥ ६ ॥ १२९॥
तूं धेनू वत्स मी तान्हें । तूं इंदू चक्रवाक मी ॥
स्वर्नदी रूपत्वत्पादा । आदरें दास हा नमी ॥ ७ ॥ १३० ॥

ठेव आतां शिरीं माझ्या। कृपेचा करपंजर ॥
शोक चिंता निवारावी। गणू हा तव किंकर ॥ ८ ॥ १३१ ॥
या प्रार्थनाष्टकें करून। मी करीतों साष्टांग नमन ॥
पापताप आणि दैन्य। माझें निवारा लवलाहीं ॥ १३२ ॥
तूं गाय मी वासरूं। तूं माय मी लेकरूं ॥
माझे विषयीं नको धरूं। कठोरता मानसीं ॥ १३३ ॥
तूं मलागिरी चंदन। मी कांटेरी झुडुप जाण ॥
तूं पवित्र गोदा जीवन। मी महापातकी ॥ १३४ ॥
तुझें दर्शन होवोनिया। दुर्बुद्धी घाण माझे ठाया ॥
राहिल्या तैशीच गुरुराया। चंदन तुजला कोण म्हणे ॥ १३५ ॥
कस्तुरीच्या सहवासें। मृत्तिका मोल पावतसे ॥
पुष्पासंगें घडतसे। वास मस्तकीं गुरुराया ॥ १३६ ॥
थोराची ती हीच रीती। ते ज्या ज्या गोष्टी ग्रहण करिती ॥
त्या त्या वस्तूंना पाववती। ते महत्पदाकारणें ॥ १३७ ॥
भस्म कौपीन नंदीचा। शिवें केला संग्रह साचा ॥
म्हणून त्या वस्तूंचा। गौरव होत चहूंकडे ॥ १३८ ॥
गोपरंजनासाठीं। वृंदावनीं यमुना तटीं ॥
काला खेळला जगजेठी। तोही मान्य झाला बुधां १३९ ॥
तैसा मी तो दुराचारी। परी आहें तुमच्या पदरीं ॥
म्हणून विचार अंतरीं। याचा कराहो गुरुराया ॥ १४० ॥
ऐहिक वा परमार्थिक। ज्या ज्या वस्तूंस मानील सुख ॥
माझें मन हें निःशंक। त्या त्या तुम्ही पुरविणें ॥ १४१ ॥
आपुल्या कृपेनें ऐसें करा। मनालागीं आंवरा ॥
गोड केल्या सागरा। क्षारोद्गमनाची नसे भिती ॥ १४२ ॥

सागरा गोड करण्याची । शक्ति आपणामध्यें साची ॥
म्हणून दास गणूची । याचना ही पुरी करा ॥ १४३ ॥
कमीपणा जो जो माझा । तो तो अवघा तुझा॥
सिद्धांचा तूं आहेस राजा । कमीपणा न बरवा तुजशीं ॥ १४४ ॥
आतां कशास्तव बोलूं फार । तूंच माझा आधार ॥
शिशू मातेच्या कडेवर । असल्या निर्भय सहजची ॥ १४५ ॥
असो या स्तोत्रासीं । जे जे वाचतील प्रेमेसी॥
त्यांच्या त्यांच्या कामनेसी । तुम्हीं पुरवा महाराजा ॥ १४६ ॥
या स्तोत्रास आपुला वर । हाच असो निरंतर ॥
पठणकर्त्याचें त्रिताप दूर । व्हावे एक संवत्सरीं ॥१४७॥
शुचिर्भूत होऊन । नित्य स्तोत्र करावें पठण ॥
शुद्धभाव ठेवून । आपुलिया मानसीं ॥ १४८ ॥
हें अशक्य असलें जरी । तरी प्रत्येक गुरुवारीं ॥
सद्गुरु मूर्ति अंतरीं । आणून पाठ करावा ॥ १४९ ॥
तेंही अशक्य असल्यास । प्रत्येक एकादशीस ॥
वांचणें या स्तोत्रास । कौतुक त्याचें पहावया ॥ १५० ॥
स्तोत्र पाठकां उत्तम गती । अंती देईल गुरुमूर्ति ॥
ऐहिक वासना सत्वर गती । त्याची पुरवून श्रोते हो ॥ १५१ ॥
या स्तोत्राच्या पारायणें । मंद बुद्धि होतील शहाणे ॥
कोणा आयुष्य असल्या उणे । तो पठणें होय शतायु ॥ १५२॥
धनहीनता असल्या पदरीं । कुबेर येऊन राबेल घरीं ॥
हें स्तोत्र वाचल्यावरी । सत्य सत्य त्रिवाचा ॥ १५३ ॥
संतति हीना संतान । होईल स्तोत्र केल्या पठण ॥
स्तोत्र पठकाचें संपूर्ण । रोग जातील दिगंतरा ॥ १५४ ॥

भय चिंता निमेल । मान मान्यता वाढेल ॥
अविनाश ब्रम्ह फळेल । नित्य स्तोत्राच्या पारायणें ॥ १५५ ॥
धरा बुध हो स्तोत्राविशीं । विश्वास आपुल्या मानसीं ॥
तर्क वितर्क कुकल्पनेशीं । जागा मुळीं देऊं नका ॥ १५६ ॥
शिर्डी क्षेत्राची वारी करा । पाय बाबांचे चित्तीं धरा ॥
जो अनाथांचा सोयरा । भक्तकामकल्पद्रुम ॥ १५७ ॥
त्याच्या प्रेरणे करून । हें स्तोत्र केलें लेखन ॥
मज पामरा हातून । ऐसी रचना होय कैसो ॥ १५८ ॥
शके अठराशें चाळीसांत । भाद्रपद शुद्ध पक्षांत ॥
तिथी गणेश चतुर्थी सत्य । सोमवारीं द्वितीय प्रहरीं ॥ १५९ ॥
श्री साईनाथ स्तवन मंजिरी । पूर्ण झाली महेश्वरीं
पुनित नर्मदेच्या तिरीं । श्री अहिल्ये सन्निध ॥ १६० ॥
महेश्वर क्षेत्र भलें । स्तोत्र तेथें पूर्ण झालें ॥
प्रत्येक शब्दासीं वदविलें । श्री साईनाचें शिरुन मनीं ॥ १६१॥
लेखक शिष्य दामोदर । याज झाला साचार
दास गणू मी किंकर । अवघ्या संत महंतांचा ॥ १६२ ॥
स्वस्ति श्री साईनाथ स्तवन मंजिरी । तारक होवो भव सागरीं ॥
हेच विनवी अत्यादरीं । दास गणु श्री पांडुरंगा ॥ १६३ ॥

श्री हरिहरार्पणमस्तु । शुभं भवतु । पुंडलीकवरदहरी विठ्ठल ॥
सीताकांतस्मरण जय जय राम । पार्वतीपते हर हर
महादेव ॥ सद्गुरु साईनाथ महाराजकी जय ।

॥ श्री सद्गुरु साईनाथार्पण मस्तु शुभं भवतु ॥

# अध्याय ६ वा.

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः । श्रीगुरुभ्योनमः ॥
श्रीकुलदेवतायैनमः । श्रीसीतारामचंद्राभ्यांनमः ।
श्रीसद्गुरु साईनाथायनमः ॥

असो परमार्थू वा संसारू । जेथें सद्गुरु कर्णधारू ॥
तेंचि तारूं पैलपारू । नेऊन उतारू लावील ॥ १ ॥
सद्गुरू शब्दें वृत्ती उठवा । साईच प्रथम आठवती चित्ता ॥
उभेच ठाकती सन्मुखता । ठेविती माथा निजहस्त ॥ २ ॥
धुनीमाजील उदी समन्वित । पडे जंव मस्तकीं वरदहस्त ॥
हृदय स्वानंदें उलून येत । प्रेम ओसंडत नेत्रांतुनी ॥ ३ ॥
नवल गुरुहस्त स्पर्श विंदान । प्रलयाग्नींतही न होई जो दहन ॥
त्या सूक्ष्म देहाचें करी ज्वलन । भस्मीभवन करस्पर्शें ॥ ४ ॥
चुकूनि देवाची कथा वार्ता । निघाल्या उठे तिडीक माथा ॥
वाचा प्रवाहें वाष्कळता । तयाही स्थीरता लाधावी ॥ ५ ॥
शिरीं ठेवितां करकमल । अनेका जन्मींचे परिपक मल ॥
जाती धुवूनि होती निर्मल । भक्त प्रेमळ साईचे ॥ ६ ॥
रूप पाहातां तें गोमटें । परमानंदें कंठ दाटे ॥
नयनीं आनंदा पाझरे फुटे । हृदयीं प्रगटे अष्टभाव ॥ ७ ॥

सोहंभावास जागवीत । निजानंदास प्रकटवीत ॥
ठायींच मीतूं पणा विरवीत । समरसत मिरवीत अद्वैत ॥ ८ ॥
वाचूं जातां पोथीपुराण । पावलो पावलीं सद्गुरू स्मरण ॥
साईच नटे रामकृष्ण । करवी श्रवण निजचरित्र ॥ ९ ॥
परिसूं बसतां भागवत । कृष्णचि साई नखशिखांत ॥
वाटे गाई तें उद्धव गीत । भक्त निजहित साधाया ॥ १० ॥
सहज बसावें करूं वार्ता । तेथेंही साईनाथांची कथा ॥
अकल्पितचि आठवे चित्ता । योग्य दृष्टांता द्यावया ॥ ११ ॥
कागद घेऊनि लिहूं म्हणतां । अक्षरीं अक्षर येई न जुळवितां ॥
परी तोचि जेव्हां लिहवी स्वसत्ता । लिहितां लिहितां लिहवेना ॥ १२
जंव जंव अहंभाव डोकावत । निजकरें तया तळीं दडपित ॥
वरी करोनि निज शक्तिपात । शिष्यास कृतार्थ करीत तें ॥ १३ ॥
काया वाचा मनें येतां । लोटांगणीं साई समर्था ॥
धर्मार्थ काम मोक्ष दाता । चढती न मागतां आपैसे ॥ १४ ॥
कर्म ज्ञान योग भक्ती । या चौमार्गीं ईश्वर प्राप्ती ॥
जरी हीं चार चौवाजूं निघतीं । तरीही पोंचविती निजठाया ॥१५॥
भक्ती ही बाभुळवनींची वाट । त्यांचा खळगे अती बिकट ॥
एक पावलीं परी ती नीट । हरी निकट नेईकीं ॥ १६ ॥
कांटा टाळूनि टांका पाय । हाचि एक सुलभ उपाय ॥
तरींच निजधाम पावाल निर्भय । निक्षूनि गुरुमाय वदे हें ॥ १७ ॥
मनाचे मळे जें भक्तीं शिंपिले । वैराग्य खुले ज्ञान फुलें ॥
कैवल्य फळें चित्सुख उफलें । अचूक चुकलें जन्ममरण ॥ १८ ॥

मूळ परमात्मा स्वयंसिद्ध। तोचि सच्चिदानंद त्रिविध ॥
उपाधी योगें झाला प्रबुद्ध। प्रगट बोध भक्तार्थ ॥ १९ ॥
जैसा तो या त्रैगुण्यें व्यक्त। मायाही होऊन क्रिया प्रयुक्त ॥
सत्व-रज-तमा चाळवीत। करी सुव्यक्त निजगुण ॥ २० ॥

मृत्तिकेचा विशिष्ट आकार। तया नाम घट साचार ॥
घट फुटतां नाम रूप विकार। निघूनि पार जातात ॥ २१ ॥
हें अखिल जग माये पासाव। परस्परां कार्य कारण भाव ॥
मायाचि प्रत्यक्ष सावयव। होऊनि उद्भवली जगरूपें ॥ २२ ॥
जगा आधीं मायेची स्थिती। पाहूं जातां नाहीं व्यक्ती ॥
परमात्मरूपीं लीन होती। परम अव्यक्तीं संचली ॥ २३ ॥
व्यक्त होतांही परमात्मरूप। अव्यक्त तरीं ही परमात्मरूप ॥
एवंच ही माया परमात्मरूप। अभेदरूप परमात्मीं ॥ २४ ॥
मायेनें तमोगुणापासून। केले जडपदार्थ निर्माण ॥
निर्जीव चलन वलन शून्य। क्रिया पूर्ण ही प्रथम ॥ २५ ॥

मग मायेच्या रजोगुणीं। परमात्मचित्गुणाची मिळणी ॥
होतां उघडली चैतन्य खाणी। स्वभावगुणीं उभयांचे ॥ २६ ॥
पुढें या मायेचा सत्वगुण। करी बुद्धि तत्व निर्माण ॥
तेथ परमात्म्याचा आनंदगुण। मिसळतां त्येळा संपूर्णता ॥ २७ ॥
एवं माया महा विकारी। क्रियोपाधि जों न स्वीकारी ॥
पूर्वोक्त पदार्थातें न करी। त्रिगुण तोंवरी अव्यक्त ॥ २८ ॥
गुणानुरूप क्रिया कांहीं। न करितां माया व्यक्त नाहीं ॥
राहूं शके अव्यक्त पाहीं। स्वयें जें सेवी अक्रियत्व ॥ २९ ॥

माया कार्य परमात्म्याचें । जग हें कार्य त्या मायेचें ॥
सर्व खल्विदं ब्रह्मत्वाचें । ऐक्य तिहींचें तें हेंची ॥ ३० ॥

ऐसी जे हे अभेद प्रतीति । कैसेनि प्राप्तहोय निश्चिती ॥
ऐसी उत्कटेच्छा जया चित्तीं । वेद श्रुति पहावी ॥ ३१ ॥

सारासार विचार शक्ति । वेदशास्त्र श्रुति स्मृती ॥
गुरु वेदांत वाक्य प्रतीति । परमानंद प्राप्ती दे ॥ ३२ ॥

"माझिया भक्तांचे धामीं । अन्नावस्त्रास नाहीं कमी" ॥
ये अर्थीं श्री साई दे हमी । भक्तांसि नेहमीं अवगत ॥ ३३ ॥

मज भजती जे अनन्यपणें । सेविती नित्याभियुक्तमनें ॥
तयांचा योगक्षेम चालविणें । ब्रीद हें जाणें मी माझें ॥ ३४ ॥

हेंच भगवद्गीता वचन । साई म्हणती माना प्रमाण ॥
नाहीं अन्नावस्त्राची वाण । तदर्थ प्राण वेचूं नका ॥ ३५ ॥

देवद्वारीं मान व्हावा । देवापुढेंच पदर पसरावा ॥
तयाचाच प्रसाद जोडावा । मान सोडावा लौकिकी ॥ ३६ ॥

काय लोकीं मान डोलविली । तितुक्यानेंका भरली भुली ॥
आराध्य मूर्ति चित्तीं द्रवली । धर्में डवडवली पाहिजे ॥ ३७ ॥

हेंच ध्येय लागो गोड । सर्वेंद्रियीं भक्तीचें वेड ॥
इंद्रिय विकारां भक्तीचे मोड । फुटोत कोड मग काय ॥ ३८ ॥

सदैव ऐसें भजन घडो । इतर कांहींही नावडो ॥
मन मन्नाम स्मरणीं जडो । विसर पडो अवघ्याचा ॥ ३९ ॥

नाहीं मग देह-गेह-वित्त । परमानंदीं जडेल चित्त ॥
मन समदर्शी आणि प्रशांत । परिपूर्ण निश्चित होईल ॥ ४० ॥

सत्संग फेडीयाची खूण । वृत्तीस पाहिजे समाधान ॥
नानाठायीं वसे जें मन । तें काय सल्लीन म्हणावें ॥ ४१ ॥

तरी होऊनि दत्तावधान । श्रोतां भावार्थें परिसिजे निरूपण ॥
करितां हें साईचरित्र श्रवण । भक्तिप्रवण मन होवो ॥ ४२ ॥

कथा संगती होईल तृप्ती । लाधेल चंचलमना विश्रांती ॥
होईल तळमळीची निवृत्ती । सुख संवित्ती पावाल ॥ ४३ ॥

आतां पूर्वील कथानुसंधान। मशीदीचें जीर्णोद्धरण ॥
रामजन्माचें कथा कीर्तन । चालवूं निरूपण पुढारां ॥ ४४ ॥

भक्त एक गोपाळ गुंड । जयास बाबांची भक्ति उदंड ॥
मुखीं बाबांचें नाव अखंड । काळ कंठण ये रीती ॥ ४५ ॥

तयास नव्हतें संतान । पुढें साई प्रसादें करून ॥
पावता झाला पुत्र रत्न । चित्त प्रसन्न जाहलें ॥ ४६ ॥

झालें गोपाळ गुंडाचें मानस । यात्रा एक अथवा उरूस ॥
भरवावा शिर्डीग्रामीं वर्षा । होईल उल्हास सर्वत्रां ॥ ४७ ॥

तात्या कोते, दादा कोते । माधवरावादि प्रमुख जनातें ॥
रुचला विचार हा सकळांतें । तयारीतें लागले ॥ ४८ ॥

परी या वार्षिक उत्सवा लागून । आधीं एक नियम निर्बंधन ॥
जिल्हाधिकारी यांचें अनुमोदन । करणें संपादन आवश्यक ॥४९॥

तदर्थ उद्योग करूं जातां । गांवी जो एक कुळकर्णी होता ॥
कुत्सितपणें उलटा जातां । आला मोडता कार्यांत ॥ ५० ॥

---

१ हे मोजणी खात्यांत सर्व्हेअर असून यांचेवर साईबाबांची फार कृपा असे.

कुळकर्णी जो आडवा पडला । पहा कैसा परिणाम आला ॥
यात्रा भरूं नये शिर्डीला । हूकूम झाला जिल्ह्याचा ॥ ५१ ॥
परी ही यात्रा भरावी शिर्डींत । बाबाचेंही हेंच मनोगत ॥
आज्ञापूर्ण आशिर्वाद युक्त । होती तदर्थ झालेली ॥ ५२ ॥
ग्रामस्थांनीं पिच्छा पुरविला । जिवापाड यत्न केला ॥
अधिकारियांनीं हुकूम फिरविला । मान राखिला सकळांचा ॥५३॥
तेव्हांपासून बाबांच्या मतें । यात्रा ठरविली रामनवमीतें ॥
व्यवस्था पाहती तात्या कोते । यात्रा येते अपरंपार ॥ ५४ ॥
त्याच रामनवमीचे दिसीं । भजन पूजन समारंभेसी ॥
तासे चौघडे वाजंत्रेसी । यात्रा चौपासी गडगंज ॥ ५५ ॥
वर्षास दोन नवीं निशाणें । समारंभें होई मिरवणें ॥
मशीदीचे कळसास बांधणें । तेथेंच रोवणें अखेर ॥ ५६ ॥
त्यांतील एक निमोणेकरांचें । दुजें निशाण दामू अण्णांचें ॥
मिरवणें होतें थाटामाटाचें । फडकतें कळसाचे अग्रभागी ॥ ५७ ॥
पुढें रामनवमीचा उत्सव । उरुसा पोटीं कैसा समुद्भव ॥
परिसा तें कथानक अभिनव । स्वानंद गौरव शिर्डीचें ॥ ५८ ॥
शके अठराशें तेहतीस सालीं । रामनवमी प्रथम झाली ॥
उरुसापोटीं जन्मास आली । तेथून चालली अव्याहत ॥ ५९ ॥
प्रसिद्ध कृष्ण जागेश्वर भीष्म । तेथून या कल्पनेचा उगम ॥
करावा रामजन्मोपक्रम । लाधेल परम कल्याण ॥ ६० ॥

१ यांचें पूर्ण नांव शंकरराव रघुनाथ देशपांडे उर्फ नाना साहेब निमोणकर.

२ अहमदनगरचे एक बाबांचे फार जुने कासार जातीचे भक्त आहेत.

तेथ पर्यंत केवळ उरूस । यात्रा भरत असे बहुवस ॥
त्यांतून हा जन्मोत्सव सुरस । आला उदयास ते साली ॥ ६१ ॥
एकदां भीष्म स्वस्थचित्त । वाडियामाजी असतां स्थित ॥
काका[1] पूजासंभार समवेत । जावया मशीदींत उद्युक्त ॥ ६२ ॥
अंतरीं साईदर्शन काज । वरी उरुसाची ही मौज ॥
काका आधींच एक रोज । शिर्डींत हाजर उत्सवार्थ ॥ ६३ ॥
पाहूनिया समय उचित । भीष्म तेव्हां काकांस पुसत ॥
सद्वृत्ती एक मनीं स्फुरत । द्याल का मदत मज लागीं ॥ ६४ ॥
येथें वर्षास भरतो उरूस । रामजन्माचा हा दिवस ॥
तरीं जन्मोत्सव संपादायास । आहे अनायास ही संधी ॥ ६५ ॥
काकांस आवडला तो विचार । घ्या म्हणाले बाबांचा होकार ॥
आहे तयांच्या आज्ञेवर । कार्यास उशीर नाहीं मग ॥ ६६ ॥
परि उत्सवा लागे कीर्तन । उभा राहिला तोही प्रश्न ॥
खेडेगांवी हरदास कोठून । ही एक अडचण राहिली ॥ ६७ ॥
भीष्म म्हणती मी कीर्तनकार । तुम्ही धरा पेटीचा स्वर ॥
राधाकृष्णाबाई तयार । सुंठवडा वेळेवर करितील ॥ ६८ ॥
चला कीं मग बाबांकडे । विलंब हें शुभकार्या सांकडें ॥
शुभासि जें शीघ्रत्व जोडे । साधे रोकडें तें कार्य ॥ ६९ ॥
चला आपण पुसावयास । आज्ञा कीर्तन करावयास ॥
ऐसें म्हणतांच मशीदीस । दोघे ते समयास पातले ॥ ७० ॥
काका आरंभ करितां पूजेतें । बाबाच जाहले प्रश्न पुसते ॥
काय वाड्यांत चाललें होतें । सुचेनातें काकांना ॥ ७१ ॥

१ लक्ष्मण गणेश उर्फ काका महाजनी.

तात्काळ बाबा भीष्माप्रती । तोच प्रश्न अन्यरीती ॥
कां बुवा काय म्हणती । म्हणवूनि पुसती तयांतें ॥ ७२ ॥

तेव्हां काकांस आठव झाला । उद्दिष्टार्थ निवेदियेला ॥
विचार बाबांचे मनास रुचला । निश्चित केला उत्सव ॥ ७३ ॥

दुसरे दिवशीं प्रातःसमयाला । पाहूनि बाबा गेले लेंडीला ॥
सभा मंडपीं पाळणा बांधिला । थाट केला कीर्तनाचा ॥ ७४ ॥

पुढें वेळेवर श्रोते जमले । बाबा परतले भीष्म उठले ॥
काका पेटीवर येऊन बैसले । बोलावूं पाठविलें तयांनां ॥ ७५ ॥

"बाबा बोलाविती तुम्हास । ऐकतां काकांचे पोटीं धस्स ॥
काय आलें न कळे मनास । कथेचा विरस ना होवो ॥ ७६ ॥

ऐकूनि बाबांचें निमंत्रण । काकांची तेथेंच झाली गाळण ॥
बाबा कां बरें क्षुब्ध मन । निर्विघ्न कीर्तन होईल ना ॥ ७७ ॥

पुढें चालती मागें पहाती । भीत भीत पायऱ्या चढती ॥
मंदमंद पाउलें पडती । चिंतावर्ती बहु काका ॥ ७८ ॥

बाबा तयांस करिती विचारणा । कशास येथें बांधिला पाळणा॥
कथा तात्पर्य आणि योजना । ऐकून मना आनंदले ॥ ७९ ॥

मग तेथें जवळ निंबर । घेऊन तेथून एक हार ॥
घातला काकांच्या कंठीं सुंदर । भीष्माकरितां दिला दुजा ॥ ८० ॥

पाळण्याचा प्रश्न परिसतां । उपजली होती मोठी चिंता ॥
परी गळां तो हार पडतां । सर्वांस निश्चितता जाहली ॥ ८१ ॥

आधींच भीष्म बहुश्रुत । विविध कथा पारंगत ॥
कीर्तन जाहलें रसभरित । आनंद अपरिमीत श्रोतयां ॥ ८२ ॥

बाबाही तैं प्रसन्न वदन । जैसें दिधलें अनुमोदन ॥
तैसाच उत्सव घेतला करवून । कीर्तन भजन समवेत ॥ ८३ ॥
रामजन्माचिया अवसरीं । गुलाल बाबांच्या नेत्राभीतरी ॥
जाऊनि प्रकटले बाबा नरहरी । कौसल्ये मंदिरीं श्रीराम ॥८४॥
गुलालाचें केवळ मीष । रामजन्माचा तो आवेश ॥
होईल अहं-रावणाचा नाश । दुर्वृत्ती राक्षस मरतील ॥ ८५ ॥
एकाएकीं आला कोप । प्रत्यक्ष नरसिंव्हाचें रूप ॥
सुरू झाले शिव्याशाप । वर्षाव अमूप जाहला ॥ ८६ ॥
पाळण्याचे होतील तुकडे । राधाकृष्णा मनीं गडबडे ॥
राहील कैसा धड हें सांकडें । येऊन पडे तिजलागीं ॥ ८७ ॥
सोडा सोडा लवकर सोडा । पाठीस लागतां तिचा लकडा ॥
काका तेव्हां सरकले पुढा । पाळणा सोडावयातें ॥ ८८ ॥
तंव तो बाबा अती कावले । काकाचिया अंगावर धांवले ॥
पाळणा सोडणें जागींच राहिलें । वृत्तीवर आले बाबाही ॥ ८९ ॥
पुढें दुपारीं आज्ञा पुसतां । बाबा काय वदले आश्चर्यता ॥
एव्हांच कैंचा पाळणा सोडतां । आहे आवश्यकता अजून ॥ ९० ॥
ही आवश्यकता तरी कसली । अन्यथा नव्हे साई-वचनावली ॥
विचार करितां बुद्धि स्फुरली । सांगता झाली न उत्सवाची ॥९१॥
येथवरीं जरी उत्सव झाला । दुसरा दिन जों नाहीं उगवला ॥
नाहीं झाला जों गोपाळकाला । उत्सव सरला न म्हणावें ॥ ९२ ॥
एणे प्रमाणे दुसरे दिनीं । गोपालकाला कीर्तन होऊनी ॥
पाळणा मग सोडाया लागुनी । आज्ञा बाबांनी दीधली ॥ ९३ ॥

१हा रामजन्मास लागणारा पाळणा या बाईनी पुरविला होता. २ संपूर्णता

पुढील वर्षी भीष्म नव्हते । बाळाबुवा सातारकरांतें ॥
कीर्तनार्थ आणविणें होतें । जाणें कवठ्यातें तयांना ॥ ९४ ॥
म्हणून बाळाबुवा भजनी । प्रसिद्ध अर्वाचीन तुका म्हणुनी ॥
घेउनि आले काका महाजनी । उत्सव त्या हातूनि करविला ॥९५
हेही जरी मिळाले नसते । काकाच कीर्तनार्थ उभे रहाते ॥
दासगणूकृत अख्यान त्यांतें । पाठचि होतें नवमीचें ॥ ९६ ॥
तिसरे वर्षी सातारकर । बाळाबुवांचेंच शिर्डीवर ॥
आगमन जाहलें वेळेवर । कैसें सादर परिसा तें ॥ ९७ ॥
ऐकुनि साईबाबांची कीर्ती । दर्शन काम उद्भवला चित्तीं ॥
परी मार्गात पाहिजे संगती । लाभेल केउती ही इच्छा ॥ ९८ ॥
बाळाबुवा स्वयें हरदास । साताऱ्याकडे मूळ रहिवास ॥
मुंबापुरीं परेळास । होता निवास ये समयीं ॥ ९९ ॥
बिऱ्हाड सिद्धकवठे म्हणून । सातारा जिल्ह्यांत देवस्थान ॥
तेथें रामनवमीचें कीर्तन । वर्षासन बुवांस ॥ १०० ॥
आशाढीची एकादशी । रामनवमी चैत्र मासीं ॥
या दोन वार्षिक उत्सवांसी । बाळाबुवांसीं संबंध ॥ १०१ ॥
बादशाही सनद पाहतां । वडे बाबांचे खर्चा करितां ॥
रुपये चतुर्विंशति शतां । मूळ व्यवस्था संस्थानीं ॥ १०२ ॥

* "बिऱ्हाड सिद्धकवठे" म्हणून सातारा जिल्ह्यांत एक गांव आहे. तेथील रामनवमीच्या उत्सवाचें या बुवांस वर्षासन आहे.

१ ही सनद अकबर बादशहापासूनची आहे व तो खर्च व शिवरात्रीचे उत्सवाचा खर्च वगैरेसह या देवस्थानाचे इतर सर्व खर्च सांप्रत सांगली संस्थानामार्फत चालतात असें समजते. सारांश हें देवस्थान फार जुनें व सांगली संस्थानच्या आधीचें आहे.

असो या दोन उत्सवालागीं । रुपये त्रिशत बुवांची बिदागी ॥
परी ते वर्षी कवठयास मरगी । पडले प्रसंगीं ग्रामस्थ ॥ १०३ ॥
तेणें रामनवमी राहिली । बुवांस तेथून पत्रें आलीं ॥
यावें आतां पुढील सालीं । ग्रामची खाली झालासे ॥ १०४ ॥
सारांष रामाची सेवा चुकली । बिदागी ही जागीं राहिली ॥
शिर्डीस जावया संधी फावली । भेट घेतली दीक्षीतांची ॥ १०५ ॥
दीक्षीत बाबांचे परमभक्त । शिरडी गमनाचा मनोगत ॥
पुरेल त्यांनीं आणितां मनांत । स्वार्थ परमार्थ साधेल ॥ १०६ ॥
वदती तैं ते दीक्षीतांलागून । यंदा राहिलें वर्षासन ॥
घ्यावें वाटे बाबांचे दर्शन । तेथेंच कीर्तन करावें ॥ १०७ ॥
भाऊसाहेब तेव्हां वदती । बिदागीची नाहीं निश्चिती ॥
देणें न देणें बाबांचे हातीं । लागेल संमती कीर्तनाही ॥ १०८ ॥
इतुकें संभाषण चाललें असतां । काका महाजनी येऊनि अवचिता ॥
शिर्डीप्रसाद उदी वाटितां । शुभशकुनता गमली ते ॥ १०९ ॥
तेच वेळीं महाजनी । आले होते शिरडीहुनी ॥
क्षेम कुशल वृत्त कळवूनि । मग निज सदनीं परतले ॥ ११० ॥
असो पुढें बुवाप्रतीं । दीक्षीत तेंव्हां परम प्रीती ॥
म्हणती विचारीन बाबांची संमती॥दिधल्या निश्चिती कळवीन ॥१११॥
पत्र येतां शिरडीस यावें । वाटखर्चीलागी न भ्यावें ॥
तदर्थ नलगे आपणां झिजावें । निःशंक असावें मनास ॥ ११२॥
असो पुढें दीक्षीत गेले । बाबांनीं अनुमोदनही दिधलें ॥
बाळाबुवा शिर्डीस आले । दर्शन घडलें यथेष्ट ॥ ११३ ॥

---

२ हरी सिताराम उर्फ काकासाहेब दीक्षित.

साईबाबांहीं सन्मुख सगळा । रामनवमीचा उत्सव सोहळा ॥
बाळाबुवांच्या हस्तें घेतला । करवूनि नवलाव प्रेमानें ॥ ११४ ॥
बाळाबुवाही मनीं तुष्टले । चिंतिलें कार्य पार पडलें ॥
साईही प्रसन्न चित्त जाहले । मनोरथ पुरले सर्वांचे ॥ ११५ ॥
संभावनाही यथास्थित । शतोपरीं पंचाशत ॥
रुपये घ्यावया आज्ञा होत । आनंद अपरिमीत बुवांस ॥ ११६ ॥
पंचवार्षिक कवठ्याची प्राप्ती । एकाच उत्सवीं बाबा देती ॥
बाळाबुवा कां न आनंदती । आभारी होती बाबांचे ॥ ११७ ॥
असो पुढें एके दिवशीं । दासगणू येतां शिर्डीसी ॥
देवविला प्रार्थूनि बाबांसीं । उत्सव प्रतिवर्षी तयांस ॥ ११८ ॥
तेथूनि पुढें हा कालवरी । होताहे जन्मो सव गडगजरीं ॥
अन्न संतर्पण आकंठवरी । महारा पोरीं आनंद ॥ ११९ ॥
समाधीच्या महाद्वारीं ॥ मंगल वाद्यांचिया गजरीं ॥
साई–नाम–घोप अंबरीं । आनंद निर्भरीं कोंदाटे ॥ १२० ॥
जैसी यात्रा वा उरुस । तैसेंच स्फुरलें गोपाळ गुंडास ॥
कीं त्या जीर्ण मशीदीस । रूप गोंडस आणावें ॥ १२१ ॥
मशिदीचाही जीर्णोद्धार । व्हावा आपुले हस्तें साचार ॥
भक्त गोपाळ गुंडाचा निर्धार । पाषाण तयार करविले ॥ १२२ ॥
परी हा जीर्णोद्धार योग । नव्हता वाटे गुंडाचा भाग ॥
या विशिष्ट कार्याचा सुयोग । आला मना जोग पुढावा ॥१२३
वाटे बाबांच्या होतें मनीं । करावें हें कार्य नानांनी[1] ॥
फरसबंदी मागाहुनी । करावी काकांनी[2] तदनंतर ॥ १२४ ॥

---

१-नानासाहेब चांदोरकरांनीं  २-काकासाहेब दीक्षित

तैसेंच पुढें घडूनि आलें । आधीं आज्ञा मागतां थकले ॥
म्हाळसापतीस मध्यस्ती घातले । अनुमोदन दिधलें बाबांही ॥ १२५॥

असो जेव्हां मशिदीसी । निशींत एका झाली फरसी ॥
तेथून मग दुसरेच दिवशीं । बाबा गादीसीं बैसले ॥ १२६ ॥

अकरासालीं सभामंडप । तोही प्रचंड खटाटोप ॥
केवढा तरी महाव्याप । जाहला थरकांप सकळिकां ॥ १२७ ॥

तेंही कार्य येच रीती । ऐसीच सकल परिस्थिति ॥
असतां पूर्ण केलें भक्तीं । एके रात्रींत सायासें ॥ १२८ ॥

रात्रीं प्रयासें खांब दाटावे । सकाळीं बाबांनीं उपटूं लागावें ॥
अवसर साधूनि पुन्हा चिणावे । ऐसें शिणावें सकळिकीं ॥ १२९॥

सर्वांनीं घालावी कास । करावा रात्रींचा दिवस ॥
पुरवावा मनाचा हव्यास । अतिसायास सोसुनी ॥ १३० ॥

आधीं येथें उघडें आंगण । होतें इवलेंसे पटांगण ॥
सभामंटपा योग्य स्थान । जाहलें स्फुरण दीक्षितां १३१ ॥

लागेल तितुका पैका लावून । लोहाचे खांब कैच्या आणून ॥
बाबा चावडीस गेलेसे पाहून । काम हें साधून घेतलें ॥ १३२ ॥

---

१ एक सोनार ज्ञातींतील बाबांचें परम भक्त होते.

२ साईबाबा एकरात्र मशिदींत आणि एक रात्र जवळच्या सरकार चावडींत रहात आणि पुन्हा दुसरें दिवशीं सकाळी मशिदींत परत येत. अशी त्यांची नित्याची वहिवाट असे. ते रात्रीं सुमारें ९ वाजतां चावडींत पुष्कळ भक्त मंडळीसह वाजत गाजत असे जात. ते मशीदीचे कंपा-ऊंडाबाहेर पडले कीं रात्रीं या मंडपाचे कामाला सुरुवात व्हावी.

भक्तांनीं रात्रीचा करावा दिवस। खांब चिणावे करूनि सायास
चावडींतून परतण्याचा अवकाश।लागावें उपटण्यास बाबांनीं॥१३३॥
एकदां अत्यंत कोपायमान। एका हातीं तात्यांची मान॥
दुजियानें एका खांबास हालवून। उपटून काढूं पहात॥ १३४॥
हाल हालवून केला ढिला। तात्यांचे माथ्याचा फेटा काढिला॥
कांडें लावून पेटवूनि दिला। खड्ड्यांत टाकिला त्वेषानें॥१३५॥
तया समयींचे ते डोळे-।-दिसत जैसे अनल गोळे॥
सन्मूख पाहील कोण त्या वेळे। धैर्य गेलें सकळांचें॥ १३६॥
लगेच खिशांत हस्त घातला। रुपया एक बाहेर काढिला॥
तोही तेथेंच निक्षेपिला। जणों तो केला सुमुहूर्त॥ १३७॥
शिव्या शापांचा वर्षाव झाला। तात्याही मनीं बहु घाबरला॥
प्रसंग बहु विकट आला। प्रकार घडला कैसा हा॥ १३८॥
जन लोक विस्मयापन्न। हें काय आज आहे दुश्चिन्ह॥
तात्या पाटिलावरील हें विघ्न। होईल निवारण कैसें कीं॥१३९॥
भागोजी शिंद्यानें धीर केला। हळू हळू पुढें सरकला॥
तोही आयताच हातीं सांपडला। यथेष्ट धुमसिला बाबांही॥१४०॥

१ तात्या गणपत कोते पाटील-बायजाबाइंचे चिरंजीव.

२ याचें मुख हस्तपादादि सर्व अवयव महाव्याधीनें ग्रस्त असल्यामुळें लोक याचे वाऱ्यास उभे रहात नसत तथापि हा बाबांचा इतका भक्त होता कीं बाबा मशीदींत असतां नित्य सकाळीं आपल्या हातापायास तळव्यापासून कोपरा ढोपरा पर्यंत याचे पासून तूप चोळवून घेत आणि मशीदीपासून लेंडी पर्यंतच्या सकाळचे नित्याचे फेरीत हाच साईबाबांवर एका हातानें छत्री धरून व दुसरे हातानें पाण्यानें भरलेलें टमरेल घेऊन बाबांचे बरोबर लेंडीवर जात येत असे.

माधवेरावही हातीं लागले । तेही विटांचा प्रसाद पावले ॥
जे जे मध्यस्ती करावया गेले। वेळींच अनुग्रहिलें बाबांही ॥१४१॥

बाबांपुढें जाईल कोण । केवीं तात्याची करावी सोडवण ॥
म्हणतां म्हणतां क्रोधही क्षीण । झाला शमन बाबांचा ॥ १४२॥

तात्काळ दुकानदार बोलाविला । जरीकांठी फेटा आणविला ॥
स्वयें तात्याचे डोक्यास बांधिला। शिरपाव दिधला जणु त्यास॥१४३॥

आश्चर्यचकित लोक झाला । काय कारण या रागाला ॥
किमर्थ तात्यावरी हा हल्ला । केला गिल्ला बाबांनीं ॥ १४४ ॥

कोपास चढले किंनिमित्त । क्षणांत पाहतां प्रसन्नचित्त ॥
यांतील कारण यत्किंचित । कोणासही विदित होईना ॥ १४५ ॥

कधीं असत शांत चित्त । प्रेमें गोष्टी वार्ता वदत ॥
कधीं न लगतां निमिष वा निमित्त । क्षुब्ध चित्त अवचित ॥ १४६॥

असो ऐशा या बाबांच्या गोष्टी । एक सांगतां एक आठवती ॥
सांगू कोणती ठेवूं कोणती । प्रपंच वृत्ति वरवी ना ॥ १४७ ॥

करवें न मजही आवड निवड । जैसी जिज्ञा मिळेल सवड ॥
तैसी ती श्रोतियांची होड । श्रवण कोड पुरवील ॥ १४८ ॥


पुढील अध्यायीं करावें श्रवण । वृद्ध मुखश्रुत पूर्वकथन ॥
साईबाबा हिंदू कीं यवन । करूं निरूपण यथामति ॥
दक्षिणामिषें घेऊन पैसा । जीर्णोद्धारार्थ लाविला कैसा ॥
धोती पोती खंडदुखंडसा । देह कैसा दंडीत ॥

१ माधवराव देशपांडे यांजवर बाबांचें अत्यंत प्रेम असे. लडिवाळपणानें बाबांस अरे तुरे म्हणण्याची सलगी दुसऱ्या कोणाच्याही नशिबी नव्हती.

केसे परार्थ वेठीत कष्ट । निवारीत भक्तसंकट ॥
पुढील अध्यायीं होईल स्पष्ट । श्रोते संतुष्ट होतील ॥

इति श्रीसंतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्रीसाईसमर्थ सच्चरिते । रामजन्मोत्सवादिकथनं नाम ॥
षष्ठोध्यायः संपूर्णः

श्री साईनाथार्पणमस्तु शुभभवतु.



## पोंच व अभिप्राय

श्री रामदास आणि रामदासी या प्रसिद्ध मासिकाचे ८ व्या वर्षाचे पहिले दोन अंक (८५ व ८६) "परत भेट व अभिप्रायार्थ" व्यवस्थापकांनी आमचेकडे पाठविले याबद्दल आम्हीं त्यांचे फार ऋणी आहोंत. श्री साईलीला त्यांनां दर महिन्यास भेट देऊन हा परस्पर भेटीचा व्यवहार कायम ठेवीलच. श्री रामदास आणि रामदासी हें मासिक जसें केवळ श्री समर्थांच्या लीला व त्यांचे वाङ्मय जतन करण्याच्या उद्देशानें निघालेलें आहे तसच श्री साईलीला हें मासिकही केवळ श्री सद्‌गुरु साईबाबांच्या लीला व त्यांची बोधवचनें जतन करण्याच्या उद्देशानेंच निघालेलें आहे. एकाच हेतूनें प्रेरित होऊन निघालेल्या अशा या दोन मासिकांचा भेटीचा योगायोग होणें ही त्या दोन्हीं समर्थांचीच लीला समजली पाहिजे.

अंक ८६ मध्यें चिटणीसांनीं वर्णिलेली या मासिकाची "दैना" पाहून मनास एक प्रकारची उद्विग्नता आल्याशिवाय रहात नाहीं. रामदासी हा पंथ फार मोठा आहे व श्री समर्थ सेवक अगणित आहेत. असें असूनही केवळ श्री समर्थांनां वाहिलेल्या या मासिकासंबंधीं महाराष्ट्राची इतकी उदासवृत्ति असावी व आठ वर्षांत खर्च चालण्यास पुरेसे वर्गणीदार मिळूं नयेत हें पाहून कोणालाही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाहीं. वार्षिक वर्गणी अवघी रुपये तीन असून अगाऊ कार्डें पाठविलीं असतां, १०० ग्राहकांचीं व्ही.पी., परत व्हावी ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे. " स्वराज्याची आकांक्षा करणाऱ्या तरुण महाराष्ट्रीयांनी " इकडे अवश्य लक्ष द्यावें अशी आमची त्यांना कळकळीची विनंति आहे.

या दोन्हीं अंकांत आलेला रा. भास्कर वामन भट यांचा "महाराष्ट्र धर्म " हा लेख ऐतिहासिक दृष्टीनें फार सुंदर आहे, परंतु आमच्या दृष्टीनें

तो या मासिकांत अस्थानी वाटतो. "श्री समर्थांची जन्मभूमि" हा लेख मनोरंजक तसाच मार्मिक आहे. समर्थांच्या जन्मभूमीचें प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ न घडणाऱ्या श्री समर्थ भक्तांना हा लेख वाचून जांबेचें प्रत्यक्ष दर्शन झाल्यासारखें वाटेल. जांबेस श्री समर्थांच्या जन्मभूमीवर श्री समर्थ मंदीर बांधण्याचें काम लवकरच सुरू होणार आहे तेव्हां सर्व महाराष्ट्रीयांनी आपलें औदासिन्य सोडून यथाशक्ति हातभार लावणें यांत मोठें पुण्य आहे. चालू वर्षापासून 'श्री समर्थकृत पदपदांतरें' हे [illegible] अलीकडच्या काव्यलोलुप मंडळींना ही पदें कदाचित निरस वाटण्याचा संभव आहे. परंतु मुमुक्षु व आस्तिक मंडळींना ही श्री समर्थांची [illegible] अमोलिक [illegible]

---

हे पुस्तक श्री [illegible]

[illegible] अनंत आत्माराम मोरमकर यांनी [illegible]

[illegible] आ नभंद [illegible]